# श्री.शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड

## पाहिजेत

श्री.शारदा भवन एज्युकेशन सोसायटी अंतर्गत असलेल्या विविध अनुदानीत वरिष्ठ महाविद्यालयातील गट–क आणि गट–ड मधील खालील दर्शविल्याप्रमाणे मागासवर्गीय व खूल्या प्रवर्गातील शिक्षकेत्तर पदे भरण्यासाठी मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांनी त्यांचे पत्र क्र.विशिससं/उशि/नांवि/अनु–२/२०१६–१७/१६५५ दिनांक ११–०४–२०१७ अन्वये दिलेल्या परवानगी नूसार पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पद | पे–बॅन्ड | पदसंख्या | आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनूभव |
|---|---|---|---|---|---|
| गट–क | | | | | |
| ०१ | प्रयोगशाळा सहाय्यक | 5200-20200 Grade pay 2000/- | 01 | इमाव–१ | १. एस.एस.सी. परीक्षा विज्ञान विषयासह उर्त्तीण.<br>२.शैक्षणिक/औद्योगीक/शासकीय संस्थेमधील प्रयोगशाळेत काम केल्याचा किमान एक वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य<br>३.शासनमान्य संस्थेचे संगणक अर्हततेचे प्रमाणपत्र. |
| गट–ड | | | | | |
| ०२ | ग्रंथालय परीचर | 5200-20200 Grade pay 1900/- | 01 | खुला–१ | किमान दहावी अनुत्तीर्ण विज्ञान विषयासह |
| ०३ | प्रयोगशाळा परिचर | 5200-20200 Grade pay 1900/- | 02 | अनू. जमाती–१, खुला–१ | किमान दहावी अनुत्तीर्ण विज्ञान विषयासह |
| ०४ | शिपाई (सेवक) | 4440-7440 Grade pay 1300/- | 02 | अनू. जाती–१, खुला–१ | किमान इयत्ता ४ थी परीक्षा उत्तीर्ण |

वरील सर्व पदांकरीता वयोमर्यादा व किमान पात्रता आणि निकष शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे राहतील.

सदरील पदांसाठी सादर करावयाचा विहीत आवेदन पत्राचा नमूना (अर्ज) संस्थेचे यशवंत महाविद्यालय, नांदेडच्या www.ymnanded.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. पात्र उमेदवारांनी विहीत नमून्यातील अर्ज डाऊनलोड करून संपूर्ण माहितीसह भरून आवश्यकत त्या प्रमाण पत्राच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रतीसह जाहिरात प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन पंधरा दिवसांपर्यंत सायंकाळी 05.00 वाजेपर्यन्त **मा.सचिव, श्री.शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, आय.टी.एम.इमारत, व्ही.आय.पी.रोड नांदेड 431 602** या पत्यावर पोस्टाच्या RPAD ने पोहोंचतील अशा बेताने पाठवावेत व त्यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

## सूचनाः–

१) महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अंनियो 1005/126/सेवा-4 दिनांक 31 ऑक्टोबर 2005 नूसार दिनांक 01 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर शासकिय नियमानूसार सेवेत नियुक्ती होत असल्यामुळे वरील सर्व पदांसाठी नवीन पारिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

२) मागासवर्गीय प्रवर्गातील ज्या प्रवर्गासाठी पद आरक्षीत आहे त्याच प्रवर्गातील उमेदवारांनी अर्ज करावेत. अर्जासोबत जात वैद्यता प्रमाण पत्र जोडावे. या संदर्भात महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६–ब दिनांक १२ डिसेंबर २०११ मधील तरतूदी लागू राहतील.

३) महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी पारीत केलेल्या परिपत्रकानूसार अपंग, महिला, माजीसैनिक, प्रकल्पग्रस्त व खेळाडू सदस्यांना असलेले विहीत समांतर आरक्षण लागू राहील.

४) प्रत्येक पदासाठी विहीत नमून्यातील अर्ज स्वतंत्र रित्या करणे आवश्यक आहे. **अर्जावर व पाकीटावर ज्या पदासाठी अर्ज करणार आहात त्या पदाचे नाव लिहीणे आवश्यक आहे.** तसेच अर्जावर स्वतःचा अद्ययावत (latest) पासपोर्ट साईज आकाराचा फोटो चिटकवणे आवश्यक आहे.

५) सद्या सेवेत असणाऱ्या उमेदवारांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयामार्फतच पाठविणे आवश्यक आहे.

६) उमेदवारास त्यांनी विहीत अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्यावर पत्रव्यवहार केला जाईल. मुलाखत/नेमणूक यापैकी कोणत्याही टप्प्यावर टपाल खात्याकडून उमेदवारास वेळेवर पत्र न मिळाल्यास संस्था जवाबदार राहणार नाही. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

७) विहीत अर्जासोबत जोडल्याप्रमाणे शासन अधिसुचनेनूसार प्रतिज्ञापत्र "अ" मध्ये कुटूंबा बाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

८) लेखी परीक्षा व मूलाखतीस उमेदवारांना स्वःखर्चाने उपस्थित रहावे लागेल. लेखी परीक्षा ही सामान्य ज्ञानावर आधारीत लघुत्तरी ( MCQ ) स्वरूपाची राहील. लेखी परीक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी संस्थेच्या यशवंत महाविद्यालय, नांदेडच्या www.ymnanded.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

९) भरती प्रक्रियेचे वेळापत्रक व वेळोवेळीच्या सूचना संस्थेच्या यशवंत महाविद्यालय, नांदेडच्या www.ymnanded.in या संकेत स्थळावर उपलब्ध राहतील. एकदा मुलाखत पत्र ( परीक्षेचे वेळापत्रक,मुलाखतीचे वेळा पत्रक व अनुषंगीक माहिती ) उमेदवारांना दिल्यानंतर इतर स्वतंत्र पध्दतीने सूचना पाठविल्या जाणार नाहीत, संबंधीतांनी याची काळजीपूर्वक नोंद घ्यावी.

सचिव

श्री.शारदा भवन एज्युकेशन सोसायटी,नांदेड.